शैक्षणिक संदर्भ अंक १२९ एप्रिल-मे २०२१

# सातवा माणूस

## (भाग ३)

लेखक :  हारुकी मुराकामी          अनुवाद : यशश्री पुणेकर

# सातवा माणूस

## (भाग ३)

लेखक :  हारुकी मुराकामी          अनुवाद : यशश्री पुणेकर

*वादळात त्या मुलाचा प्रिय मित्र समुद्राने ओढून नेला. या गोष्टीला आपणच जबाबदार असल्याची भावना त्याला आयुष्यभर खात राहिली. बालपणीच्या या घटनेचे परिणाम पुढे काय झाले या विषयी कथेच्या या शेवटच्या भागात वाचूया.*

त्यांना ‘क’ चं शव कधीच मिळालं नाही. आणि त्याच्या कुत्र्याचंही नाही. सहसा त्या भागात समुद्रात बुडून कोणी गेलं तर त्याचं प्रेत काही दिवसांनी पूर्व भागातल्या खाडीच्या मुखाशी मिळत असे. पण ‘क’ तिथे कधी पोचलाच नाही. ती राक्षसी लाट त्याला दूर कुठंतरी समुद्रात खोलवर घेऊन गेली. इतकी दूर की पुन्हा किनाऱ्यावर येणं शक्यच नव्हतं. त्याचा देह समुद्र तळाशी माशांचं खाद्य झाला असावा. स्थानिक मच्छीमार कितीतरी दिवस त्याचा समुद्रात शोध घेत होते. पण शेवटी सगळे हरले आणि त्यांनी शोध सोडून दिला. तो न सापडल्याने त्याचे विधिवत अंत्यसंस्कार करता आले नाहीत. विमनस्कपणे त्याचे आईवडील रोज समुद्र किनाऱ्यावर इकडे तिकडे भटकत राहायचे. कधी कधी दिवसेंदिवस घरात कोंडून घेऊन बौद्धसूत्र वाचत राहायचे.

'क' च्या आईवडिलांसाठी त्याचा मृत्यू एक असह्य आघात होता, पण त्यांनी मला 'त्याला तू समुद्रावर का घेऊन गेलास' असं कधीच विचारलं नाही. त्यांना माहिती होतं की मी नेहमीच 'क'ला मदत करत असे, संकटातून वाचवत असे. मी त्याच्यावर सख्ख्या छोट्या भावासारखं प्रेम करत होतो याची त्यांना जाणीव होती. पण सत्य काय ते मला माहिती होतं.

मला माहिती होतं की मी जर प्रयत्न केला असता तर त्याला वाचवू शकलो असतो.



मी पळत जाऊन त्याला ओढत ओढत आणून त्या राक्षसी लहरीच्या तावडीतून वाचवू शकलो असतो. त्या संपूर्ण घटनेचा कालावधी बघता हा अगदी काही मिनिटांचा खेळ होता पण तरीही जेव्हा मला ते सगळं आठवतं तेव्हा असंच वाटतं की मी त्याला वाचवू शकलो असतो. मी आधी सांगितलं की खूपच भ्यायल्यामुळे मी फक्त स्वतःला वाचवण्यासाठी पळालो आणि त्याला तिथे मरणाच्या दारात एकटं सोडून दिलं. त्याच्या आईवडिलांनी यासाठी मला कधीही दोष दिला नाही याचं मला जास्त वाईट वाटतं. बाकी लोकांनी पण काळजीपोटी माझ्याकडे त्यादिवशी समुद्रावर काय झालं याची चौकशी केली नाही.

या भावनात्मक धक्क्यातून सावरायला मला अनेक वर्षं लागली. कित्येक दिवस मी शाळेत जाऊ शकलो नाही. मी खूप कमी जेवत होतो आणि तासनतास छताकडे बघत पडून राहायचो.

'क' ची अंतिम प्रतिमा माझ्या मेंदूवर कायमची कोरली गेली होती - त्या राक्षसी लाटेच्या जिभेवर पुढच्या टोकाला एका कुशीवर निजून माझ्याकडे दोन्ही हात पसरून हसत बघणारा 'क'.... मी ते दृश्य विसरूच शकत नाही. माझ्या अस्तित्वावर डाग बनून गेलेल्या त्या दृश्याच्या कचाट्यातून मी कधीच मुक्त झालो नाही. एकतर मला झोप लागतच नसे आणि खूप मुश्किलीने झोप लागली तर स्वप्नात येऊन ते दृश्य मला छळत असे. स्वप्नात तर त्या लाटेतून उडी मारून 'क' माझं मनगट पकडून मला ओढून स्वतःबरोबर नेण्याचा प्रयत्न करत असे.

आणि मग ते स्वप्न पडलं...मी समुद्रात पोहतो आहे. ग्रीष्म ऋतूतला तो एक सुंदर दिवस आहे. आणि मी किनाऱ्यापासून दूर अगदी सहज पोहतो आहे. पाठीवर ऊन घेऊन पोहायला मजा येतीय. तेवढ्यात अचानक पाण्यात माझा उजवा पाय कोणीतरी पकडतं. माझ्या घोट्याजवळ एक घट्ट बर्फासारखा थंड हात मला जखडून ठेवतोय. त्याची पकड इतकी मजबूत असते की मी त्यातून सुटूच शकत नाही. आता मला कोणीतरी खाली खाली खेचून नेतंय आणि अचानक तिथे मला 'क'चा चेहरा दिसतो. त्याच्या चेहऱ्यावर तेच मोठं हास्य. तो माझ्याकडे टक लावून बघतोय.. मला जोरात ओरडायचंय पण तोंडातून आवाजच फुटत नाहीये. भीतीने मी घटाघटा पाणी गिळू लागतो. समुद्राचं पाणी आता माझ्या फुफ्फुसात शिरतंय. माझा जीव घाबराघुबरा होतो आणि त्याचं क्षणी मला जाग येते. अंधारात मी घामाने डबडबलो आहे आणि माझा श्वास जोरजोरात चालू आहे आणि मी भीतीने जोरात किंचाळतोय.

शेवटी मी वर्षाअखेरीस आईवडिलांच्या पाठीस लागलो की मला इथून दूर कुठेतरी जाण्याची परवानगी द्या. ज्या ठिकाणी राक्षसी लाटेने माझ्या 'क' ला गिळलं होतं तो समुद्र

किनारा मी सतत बघू शकत नव्हतो. माझी ती वाईट स्वप्नं काही माझी पाठ सोडत नव्हती. जर मी तिथून दुसरीकडे गेलो नसतो तर मी वेडाच झालो असतो. आईबाबांना माझे हाल बघवत नव्हते. त्यांनी माझी व्यवस्था माझ्या आजोबांकडे दूरच्या एका गावात केली.

जानेवारी महिन्यात मी कोमोरो प्रांतातल्या नगानो या डोंगराळ भागातल्या गावी माझ्या बाबांच्या वडिलांकडे आलो. तिथेच माझं शिक्षण पूर्ण केलं. मी कधीच आईबाबांना भेटायला तिकडे गेलो नाही, अगदी सुट्टीतही नाही, तेच दरवेळी मला भेटायला यायचे.

आजही मी नगानोमध्येच राहतो. तिथेच मी एका शिक्षण संस्थेतून अभियांत्रिकीची पदवी घेतली. त्याच भागातल्या सूक्ष्म अवजारे आणि उपकरणे बनवणाऱ्या कारखान्यात कामाला लागलो. आजही मी तीच नोकरी करतो. तुम्हाला आता समजलंच असेल की माझ्या आयुष्यात काहीही असामान्य नाही. मी फारसा कोणाशी बोलत नाही. कोणाच्यात मिसळत नाही. माझे काही अगदी मोजके मित्र आहेत त्यांच्या बरोबर मी कधीकधी टेकडीवर फिरायला जातो. जेव्हा मी त्या बालपणाच्या शहरापासून दूर गेलो तेव्हापासून ती वाईट स्वप्न पडणं कमी झालं. पण तरी ती माझ्या आयुष्याचा भागच बनून गेली होती. केव्हातरी ते स्वप्न पडत असे आणि मी ओरडत उठत असे. जणू काही संधीची वाट पाहात ते स्वप्न माझ्या दारातच उभं असे. जेव्हा ती त्रासदायक घटना अगदी विसरायला होते तेव्हा ते स्वप्न येतं म्हणजे येतंच आणि पुन्हा माझ्या त्या सगळ्या स्मृती जागवून जातं. अगदी एकेक घटना तपशीलवार तशीच्या तशी ....आणि मी पुन्हा घामाने डबडबून ओरडत उठतो.

म्हणून तर मी लग्नही केलं नाही. माझ्या शेजारी झोपणाऱ्या एखाद्या मुलीने माझ्या ओरडण्याचा त्रास का सहन करावा? या काळात माझं काही मुलींशी प्रेम जुळलं पण


त्यांच्यापैकी एकीबरोबरही मी रात्र घालवली नाही. त्या घटनेतून बसलेली भीती माझ्या हाडांमध्ये मुरली होती. ही एकच अशी गोष्ट आहे जी मी कोणाशीच मनमोकळेपणाने बोलू शकलेलो नाही.

मी चाळीस वर्षांहून अधिक काळ माझ्या गावापासून दूर राहिलो. मी त्या किनाऱ्यावर काय पण कुठल्याच समुद्र किनाऱ्यावर कधीच गेलो नाही. मला भीती वाटत होती... मी समुद्र किनारी गेलो आणि माझं ते स्वप्न खरं झालं तर.... मी उत्तम पोहू शकत होतो पण मी कधी कुठल्या पोहण्याच्या तलावात सुद्धा पोहायला गेलो नाही, मग नदी आणि विहिरीत पोहण्याचा प्रश्नच नाही. नावेत बसायला मी घाबरत असे. त्या भीतीने मी परदेशी जाण्यासाठी विमानात सुद्धा बसलो नाही. इतकी सगळी काळजी घेऊनही मला ती वाईट स्वप्नं पडतच होती आणि दरवेळी मला पाण्यात बुडवत होती. 'क'च्या थंडगार स्पर्शासारखीच त्या भयानक आभासाने माझ्या मेंदूवर जबरदस्त पकड घेतली होती आणि ती सुटतच नव्हती.

शेवटी गेल्या वसंत ऋतूमध्ये मी त्या समुद्र किनाऱ्यावर परत गेलो... इथेच 'क' ला त्या राक्षसी लाटेने माझ्यापासून दूर नेलं होतं.

एका वर्षापूर्वी माझ्या बाबांचा कॅन्सरने मृत्यू झाला होता आणि माझ्या भावाने ते जुनं वडिलोपार्जित घर विकून टाकलं होतं. तेव्हा काही जुन्या ट्रंका उघडून बघताना त्याला माझ्या लहानपणी मी साठवलेल्या अनेक गोष्टी सापडल्या. त्या त्याने माझ्याकडे नगानोला पाठवून दिल्या. बऱ्याच गोष्टी म्हणजे कचराच होता पण त्यात एक सुंदर चित्रांचा गठ्ठा होता. ही चित्र 'क' ने मला वेळोवेळी भेट दिली होती. बहुतेक माझ्या आईबाबांनी ती 'क'ची आठवण म्हणून जपून ठेवली होती. पण ती चित्रं बघून माझी भीती पुन्हा जागृत झाली. मला वाटलं

‘क’चा आत्मा मला पुन्हा त्रास द्यायला आलाय. म्हणून मग ती चित्रं मी पुन्हा बांधून ठेवून दिली. मी ती फेकूनच देणार होतो. पण मी असं करू शकलो नाही. माझ्या ‘क’ची चित्रं होती ती.... खूप दिवस मनाची चलबिचल होत होती, काय करावं सुचत नव्हतं. शेवटी मी ती चित्रं पुन्हा एकदा बघायचं ठरवून उघडली. मी ती लक्षपूर्वक बघू लागलो.



त्यातली बरीच चित्रं माझ्या ओळखीच्या परिसरातलीच होती. त्यात समुद्र किनारा आणि देवदाराचे वृक्ष पण होते. सगळ्या चित्रांना सुरेख रंगसंगती होती. ‘क’ची ती खासियतच होती. इतकी वर्ष झाली तरी त्या चित्रांचे रंग अजूनही चमकदार होते. फिके पडलेले नव्हते. त्यात खूप बारकाईने भोवतालच्या गोष्टी आल्या होत्या. ‘क’ एक कुशल चित्रकार होता याची ती साक्षच होती. मी जशी जशी ती चित्रांची पानं उलगडत गेलो, तसतसं ‘क’ बद्दल माझ्या मनात प्रेमाचा उमाळा येऊ लागला. त्याच्या गोड आठवणींनी मला घेरून टाकलं. असं वाटत होतं की त्या चित्रांमधून ‘क’ त्याच्या प्रेमळ नजरेनं माझ्याकडे बघतोय. आम्ही जिथे जिथे जायचो, ज्या काही गोष्टी एकत्र करायचो ते सगळे क्षण माझ्यासमोर एकेक करत पुन्हा तरळत होते. आणि मला समजलं की मी पण जगाकडे ‘क’ सारख्याच प्रेमळ नजरेनं बघत होतो.

आता मी रोज कामावरून आलो की ‘क’ चं एकेक चित्र घेऊन त्याचं निरीक्षण करत असे. त्या चित्राकडे बघण्यात तासनतास गुंगून जात असे. त्यातल्या प्रत्येक चित्रात माझ्या लहानपणीच्या सगळ्या दृश्यांची मला पुनर्भेट घडत असे. ती सगळी दृश्ये मी विसरूनच गेलो

होतो. ती मला पुन्हा अनुभवायला मिळत होती. ती चित्रं बघून मला असं जाणवू लागलं की एखादी चिरपरिचित गोष्ट माझ्या रक्तात मिसळली आहे, नसानसातून वाहू लागली आहे.

असाच एक आठवडा गेला. एके दिवशी माझ्या मनात विचार चमकून गेला....कदाचित मी इतकी वर्षं चुकीचा समज करून घेतला का? त्या राक्षसी लाटेच्या टोकावर निजलेला ‘क’ माझ्याकडे नक्कीच रागाने किंवा तिरस्काराने बघत नव्हता. त्याला मला त्याच्याबरोबर ओढून न्यायचं नव्हतं. माझ्याकडे बघताना त्याचं जे हसू होतं ते कदाचित उजेडाच्या विशिष्ट कोनामुळे असेल. म्हणजे ‘क’ असं काही जाणूनबुजून करतच नव्हता. तोपर्यंत तर तो कदाचित बेशुद्ध पडला असेल किंवा आता आपण कायमचे दुरावणार या भावनेने माझ्याकडे उदासवाणं हसून पाहात असेल. मी त्याच्या डोळ्यात ज्या तिरस्काराची कल्पना केली होती ती कदाचित त्यावेळी मला वाटलेल्या प्रचंड भीतीमुळे असेल. कारण तेव्हा त्या भीतीने मला पुरतं जखडलं होतं.


त्या संध्याकाळी मी ‘क’च्या चित्रांचं जितकं निरीक्षण करत गेलो तितका माझ्या नव्या विचारावर माझा अधिकाधिक विश्वास बसत गेला. याचं कारण म्हणजे ‘क’च्या चित्रांना खूप वेळ बघूनही मला त्यात एक कोवळ्या आणि निरागस मुलाचा आत्मा दिसत होता. मी बराच वेळ ‘क’ची चित्रं उलटपालट करून बघत राहिलो. मी काहीच करू शकलो नाही. बाहेर सूर्यास्त झाला आणि प्रकाश अंधुक झाला. हळूहळू अंधार खोलीत पसरू लागला. मग रात्रीची नीरव शांतता... जणूकाही ती अनेक वर्षांपासून आहे. पण शेवटी रात्रही संपली आणि फटफटू लागलं. नव्या दिवसाच्या सूर्योदयाने आकाशात लालगुलाबी रंग पसरले आणि पाखरं किलबिल करत गाऊ लागली. त्या क्षणी मला असं वाटलं की मला गेलंच पाहिजे.

मी एका पिशवीत काही गरजेच्या वस्तू घेतल्या, माझ्या ऑफिसमध्ये रजा कळवून टाकली आणि माझ्या गावी जाणाऱ्या रेल्वेत जाऊन बसलो.

तिथे गेलो तर आता ते समुद्रकिनाऱ्यावरचं शांत शहर कुठे दिसेना. साठच्या दशकातल्या वेगाने झालेल्या विकासाच्या दरम्यान ते एक औद्योगिक शहर झालं होतं. पूर्ण परिसर बदलूनच गेला होता. भेटवस्तूंच्या एका साध्या दुकानाचं मोठ्या मॉलमध्ये  रुपांतर झालं होतं. शहरातल्या एकमेव चित्रपटगृहाच्या जागी मोठा बाजार उभारला होता. माझ्या घराचं तर अस्तित्वच नष्ट झालं होतं. काही महिन्यांपूर्वीच ते पाडलं होतं आणि त्याचे अवशेष तिथे विखुरले होते. भोवतीची सगळी झाडं कापली होती...नुसते बुंधे शिल्लक होते. 'क' च्या घराचंही नामोनिशाण दिसत नव्हतं. तिथे कार ठेवण्याची जागा केली होती. मी काही फार भावूक वगैरे झालो नाही. कारण खूप वर्षांपूर्वीपासूनच ते शहर माझं राहिलं नव्हतं.

मी चालत चालत समुद्र किनारी पोचलो. त्या दगडाच्या भिंतीवर चढलो. ती अजूनही तिथेच होती. नेहमीप्रमाणेच दुसऱ्या बाजूला अथांग विशाल समुद्र आणि दूरवर क्षितीजरेषा.... किनारा पण तसाच होता. भरपूर वाळू, छोट्या छोट्या लाटा आणि किनाऱ्यावर फिरणारे बरचसे लोक. दुपारचे चार वाजून गेले होते आणि पश्चिमेला चाललेल्या ध्यानस्थ सूर्याची किरणे सगळयांची गळाभेट घेत होती. मी पिशवी वाळूवर ठेवली आणि ते सुंदर दृश्य बघत तिथेच शेजारी बसून राहिलो. आज या शांत समुद्राला बघून कल्पनाही करता येत नव्हती की काही वर्षांपूर्वी इथे एक अतिशय भयंकर वादळ आलं होतं आणि राक्षसी लाटेने माझ्या प्रिय 'क' ला गिळून टाकलं होतं. त्या त्रासदायक घटनेचा कोणीच साक्षीदार आता तिथे असण्याची शक्यता नव्हती. असं वाटू लागलं की ती घटना म्हणजे एक भासच होता, माझ्या स्वप्नात दिसणारा.

आणि तेव्हा मला जाणवलं की त्या घटनेची माझ्या मनात असलेली भीती आणि नकारात्मकता एकदम नाहीशी झाली आहे. अगदी अचानकपणे हे घडलं. ती भीती जशी अचानक आली तशीच आत्ता गायब झाली - अकस्मात. मी उठलो. बूट न काढता आणि विजार न दुमडता तसाच फेसाळलेल्या पाण्यात चालू लागलो. लाटांचा माझ्या घोट्यांना होणारा स्पर्श मला सुखावत होता. असं वाटत होतं की माझ्या बालपणीच्या लाटाच माझे पाय प्रेमाने धुवत आहेत. एक लाट लहरत यायची, मग काही काळ तसाच जायचा मग दुसरी यायची.....बाजूने फिरणारे लोक विचित्र नजरेने माझ्याकडे बघत होते पण मला काही फरक




पडला नाही. शेवटी माझ्या मनाला पुन्हा एकवार शांतता मिळाली होती.

मी वर आकाशाकडे बघितलं. कापसाच्या पुंजक्यांसारखे ढग न हलता तिथे लटकले होते. का कोण जाणे पण ते माझ्यासाठीच तिथे थांबले असावेत असं मला वाटलं. मला आठवलं काही वर्षांपूर्वी मी असंच वर बघून त्या वादळाचा केंद्रबिंदू शोधण्याचा प्रयत्न केला होता. माझ्या मनातला वेळेचा लंबक जोरजोरात हलू लागला. चाळीस वर्षं कापरासारखी उडून गेली. जणूकाही भूतकाळ आणि वर्तमानकाळ एकच झाले होते. सगळे आवाज बंद झाले आणि भोवतीचा प्रकाश थरथरू लागला. तेवढ्यात माझा तोल गेला आणि मी लाटांमध्ये कोसळलो. माझ्या हृदयाची धडधड स्पष्ट ऐकू येत होती, पण माझ्या

हातापायात त्राणच नव्हते. मी तसाच कितीतरी वेळ पाण्यात पालथा पडून राहिलो. मी उठू शकत नव्हतो. पण मला भीती वाटत नव्हती, अजिबात नाही. कसलंच भय मला नव्हतं. भीतीचे ते दिवस कधीच मागे सरले होते.

माझी ती वाईट स्वप्नं आता बंद झाली. आता मी अर्ध्या रात्री ओरडत उठत नाही. मी माझं आयुष्य कुठल्याही भयाशिवाय नव्याने सुरु करण्याचा प्रयत्न करत आहे. खरंतर आता माझ्या आयुष्याची फार वर्षं राहिली नसतील, पण उशिरा का होईना मी माझ्या भीतीपासून मुक्त झालो, पुन्हा उभं राहू शकलो, मी कृतज्ञ आहे. असंही झालं असतं की मी त्या भीतीला कवटाळूनच या जगातून गेलो असतो. भयमुक्ती शिवायच माझं जीवन संपून गेलं असतं. अंधारात ठेचकाळत राहिलं असतं.



इतकं बोलून तो सातवा माणूस गप्प झाला आणि त्याने एकेक करून आमच्या सगळ्यांकडे नजर फिरवली. आणि आम्ही काहीही हालचाल न करता स्तब्ध बसून राहिलो, जणू काही आम्ही श्वास घ्यायचं विसरूनच गेलो होतो. आम्ही गोष्ट संपण्याची वाट बघत होतो. बाहेर वारा थांबला होता. काहीच हालचाल नव्हती. सातव्या माणसाने पुन्हा कॉलरकडे हात नेला. तो बोलण्यासाठी शब्द शोधत असावा.

मग त्याचा आवाज अवकाशात पसरला- असं म्हणतात की तुम्हाला फक्त तुमच्या भीतीचं भय वाटलं पाहिजे, पण मी असं मानत नाही. – हे बोलून तो एक क्षण थांबला आणि म्हणाला – भीती तर वाटतेच. ती वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या रुपात तुम्हाला भेडसावते. अशा वेळी आपण तिच्याकडे डोळेझाक करु शकतो किंवा तिच्यापासून दूर पळू शकतो. अशावेळी आपण आपल्या आतल्या अतिशय मौल्यवान गोष्टीला कुणाच्या तरी हवाली करतो. मी स्वतःला त्या राक्षसी लाटेच्या हवाली केलं होतं. म्हणूनच ती भीती माझ्या मनावर पसरून राहिली होती.

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक ११५ मधून साभार.*

**सातवा माणूस: भाग १** https://www.sandarbhsociety.org/pdf/Issue-127/Week-06-Satwa_1-Issue-127-Shaikshanik-Sandarbh-Dec2020-Jan2021.pdf

सातवा माणूस: भाग २ https://www.sandarbhsociety.org/pdf/Issue-128/Week-05-Satava-02-Issue-128-Shaikshanik-Sandarbh-Feb-Mar-2021.pdf

§§§

---

लेखक: **हारुकी मुराकामी,** जपानी कादंबरीकार, कथालेखक आणि अनुवादक.

हिंदी अनुवाद: **सुशांत सुप्रिय**, प्रसिद्ध हिंदी कथाकार, कवी आणि अनुवादक.

चित्रे: **शिवांगी सिंह**, फाइन आर्टस् द्विपदवीधर.

मराठी अनुवाद: **यशश्री पुणेकर**, संदर्भ गटात सहभागी

*(कळीचे शब्द: कथा, चक्रीवादळ, समुद्री लाटा, हारुकी मुराकामी)*

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. मराठीतून चांगले विज्ञान वाचायला मिळावे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला प्रोत्साहन मिळावे, अनुभवांना जोडून असलेल्या विज्ञानाची सहज ओळख व्हावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हे याचे उद्देश आहेत.*

*२०१८ सालापासून आम्ही शैक्षणिक संदर्भची छापील आवृत्ती न काढता इ-अंक प्रकाशित करत आहोत व इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला* sandarbh.marathi@gmail.com *वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील.*

www.sandarbhsociety.org *या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंकही त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत.*

*हा उपक्रम विनामूल्य आहे, पण आपण आपला सहभाग ऐच्छिक देणगी रूपात संदर्भ सोसायटीकडे पाठवू शकता. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

- ***संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***